प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. २४.०२.२०२०**

# साडे बारा टक्के योजनेतील वाटप प्रक्रिया न झालेल्या इरादित भूखंडांबाबत सिडकोतर्फे सुनावणी

सिडकोच्या नवी मुंबई अधिसूचित क्षेत्रात रायगड जिल्ह्याच्या उरण व पनवेल तालुक्यांतील ज्या प्रकल्पबांधितांना साडे बारा टक्के (१२.५%) योजने अंतर्गत भूखंड इरादित करण्यात येऊनही त्यांनी वाटपपूर्व प्रक्रिया आजतागायत पूर्ण केलेली नाही, अशा भूखंडधारकांना याबाबत आपले म्हणणे मांडण्याकरिता दि. २ मार्च ते २० मार्च, २०२० या कालावधीत नोडनिहाय सुनावणीचे आयोजन सिडकोतर्फे करण्यात आले आहे. या कालावधीत संबंधित भूधारकांनी आपल्या नोडनुसार दिलेल्या तारखेस सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४ येथील सातव्या मजल्यावरी साडे बारा टक्के विभाग कार्यालय अथवा तळ मजल्यावरील समस्या निवारण केंद्र येथे उपस्थित राहून आपला खुलासा सादर करावा.

सिडकोच्या नवी मुंबई प्रकल्पा अंतर्गत उरण व पनवेल तालुक्यांतील जी गावे नवी मुंबई अधिसूचित क्षेत्रात समाविष्ट करण्यात आली होती, अशा गावांतील प्रकल्पबाधित खातेदारांना भूसंपादनापोटी साडे बारा टक्के योजने अंतर्गत भूखंड इरादित करण्यात आले होते. सदर भूखंड इरादित होऊन सुमारे ३ ते १० वर्षांचा कालावधी लोटला असून अद्यापही काही प्रकल्पबाधितांनी इरादित भूखंडासंबंधी भूखंड वाटपाबाबतची पुढील कार्यवाही केली नसल्याचे सिडकोच्या अभिलेखावरून (रेकॉर्ड) निदर्शनास आले आहे. सर्व नोडमधील अशा भूखंडांची यादी दि. २३ जानेवारी, २०२० रोजी सिडकोच्या https://cidco.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती व याबाबतची सूचनाही स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर इरादित भूखंडांपैकी पायाभूत सुविधा नसल्यामुळे संबंधित भूखंडधारकांनी वाटपपूर्व प्रक्रिया केलेली नाही, अशा भूखंडांचा नंतर विचार करण्यात येईल. तथापि या व्यतिरिक्त जे भूखंड इरादित होऊन बराच कालावधी लोटलेला आहे अशा भूखंडधारकांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन, भूखंड रद्द करून नवीन पात्र प्रकल्पग्रस्तांना देण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी. संबंधित भूखंडधारकांना याबाबत वेळीच कळावे याकरिता वैयक्तिक नोटिसा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. परंतु वाढते शहरीकरण, प्रकल्पबाधितांचे जुने पत्ते किंवा स्थलांतर यांमुळे वैयक्तिक नोटीसा त्यांच्यापर्यंत पोहोचल्या नाहीत तरी उपरोक्त संकेतस्थळांवर १८ फेब्रुवारी, २०२० रोजी नोडनिहाय भूखंडांच्या सुधारित याद्या, त्याबाबतची जाहीर सूचना व नोडनिहाय सुनावणीच्या तारखा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या याद्या भूधारकांच्या

सोयीसाठी संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, पनवेल महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या २९ गावांच्या याद्या खारघर, कळंबोली व कामोठे येथील महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयांमध्ये तसेच सिडकोच्या साडे बारा टक्के विभागातील सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

वाटप प्रक्रिया न झालेल्या नोडनिहाय भूखंडांचा तपशील पुढीलप्रमाणे :- कळंबोली-४, आसुडगांव-९, तळोजा-९३, रोडपाली-७०, नावडे-३७, करंजाडे-६०, काळुंद्रे-२६, खारघर-१२, कामोठे-I-१३, कामोठे-II-११, द्रोणागिरी-२६८, उलवे-२२७, एकूण-८३०.

नोडनिहाय सुनावणीच्या तारखा पुढीलप्रमाणे आहेत :- कळंबोली/आसुडगांव/द्रोणागिरी - २ व ३ मार्च २०२०, तळोजा/द्रोणागिरी/करंजाडे व काळुंद्रे - ५ व ६ मार्च २०२०, खारघर/द्रोणागिरी/रोडपाली - ११ व १२ मार्च २०२०, कामोठे-१/द्रोणागिरी/उलवे - १६ व १७ मार्च २०२०, कामोठे-२/उलवे/नावडे - १९ व २० मार्च २०२०.

संबंधित भूधारकांनी आपल्या नोडनिहाय दिलेल्या तारखांना उपस्थित राहून भूखंडाबाबतचे न्यायालयीन प्रकरण, घरगुती वाद इ. बाबत आपला खुलासा व्यक्तिश: अथवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यामार्फत किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तिमार्फत लेखी स्वरूपात द्यावा. लेखी खुलासा सादर करताना भूधारकांनी त्यांचा संचिका क्रमांक, यादीतील नोटीस क्रमांक, मोबाइल क्रमांक इ. माहितीही नमूद करावी. या सुनावणीकरिता संबंधित भूधारकांनी सिडकोच्या उपरोक्त कार्यालयात उपस्थित राहून आपला खुलासा सादर करावा. हा खुलासा समाधानकारक नसल्यास भूखंड रद्द करण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची संबंधित भूधारकांनी नोंद घ्यावी.

---

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**